# गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ
"सिंचन भवन", जालना रोड, औरंगाबाद-431 005
दूरध्वनी क्र.(थेट) (0240) -2342096, कार्यालय 2342097, फॅक्स 2332426
E-mail:edgmidc_abad@wrd.maharashtra.gov.in


## परिपत्रक

**विषय : आस्थापना निधी मागणी महामंडळ कार्यालयास सादर करणे बाबत.**

प्रस्तावना:-

महामंडळा अंतर्गत व इतर मंडळ कार्यालयांकडून दरमहा आस्थापना वेतन व वेतनेत्तर (वेतन व भत्ते,कार्या.खर्च,संगणक दुरुस्ती,न्यायालयीन प्रकरणे,प्रवास खर्च,वाहन परि.दुरुस्ती,इंधन इत्यादी) बाबींसाठी निधी मागणी प्राप्त होते.व सदर निधी मागणी सोबत देयकाच्या छायांकित प्रति प्राप्त होतात. परंतु महामंडळ कार्यालयातील कामाचा व्याप व दररोज/दरमहा प्राप्त होणारी आस्थापना देयकांची संख्या विचारात घेता सदर देयकांची तपासणी करणे महामंडळ स्तरावर शक्य होत नाही. सदर देयके ही विभागीय /मंडळ स्तरावरुन विभागीय लेखापाल/कार्यकारी अभियंता/अधिक्षक अभियंता यांनी तपासूनच महामंडळ कार्यालयास सादर करणे अभिप्रेत/आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने आस्थापना निधी मागणी सादर करणे बाबत महामंडळ कार्यालयाने यापूर्वी निर्गमित केलेली सर्व परिपत्रके अधिक्रमित करुन खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

निर्णय :-

1. महामंडळास सादर करण्यात येणारी आस्थापना निधी मागण्यांची देयके ही शासनाने विहित केलेल्या नियमातील तरतुदी नुसार खातरजमा करुन, संबंधितास अनुज्ञेय आहे किंवा नाही हे विभागीय/मंडळ कार्यालयात तपासून सोबतच्या विहित प्रपत्रात प्रमाणपत्रासहित सादर करण्यात यावीत.
2. विभागीय कार्यालयांनी आस्थापना रकमेची मागणी योग्य प्रकारे केली आहे, याची खात्री अधिक्षक अभियंता यांनी करावी व त्यासाठी विभागीय कार्यालयाकडून मंडळ कार्यालयाने आवश्यक ती कागदपत्रे मागवण्यास हरकत नाही.
3. देयकांच्या छायांकित प्रती किंवा इतर अनावश्यक कागदपत्रे निधी मागणी सोबत जोडण्यात येवू नयेत.
4. देयके वितरीत करताना उपलबध निधी पेक्षा देयकांची रक्कम जास्त असेल अशा वेळेस देयकांचा प्राधान्यक्रम नियमाप्रमाणे अधिक्षक अभियंता यांनी त्यांचे स्तरावर ठरवून निधी वितरीत करण्यात यावा.

वरील प्रमाणे सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन मंडळ व विभागीय कार्यालयांनी निधी मागणी प्रस्ताव महामंडळ कार्यालयास सादर करावेत.

सदर कार्यपदधती आर्थिक वर्ष 2016-17 पासून अंमलात येईल.

सोबत: विहित प्रपत्राचा नमुना

**कार्यकारी संचालक**

जा.क्र. गोमपाविम/लेखा-7/3742 दिनांक 20/04/2016:-

प्रत,

मुख्य अभियंता (जसं),जलसंपदा विभाग,औरंगाबाद
मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक,लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग,औरंगाबाद
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,उत्तर महाराष्ट्र प्रदेश,नाशिक
अधीक्षक अभियंता,औरंगाबाद पाटबंधारे मंडळ,औरंगाबाद
अधीक्षक अभियंता,नांदेड पाटबंधारे मंडळ,नांदेड
अधीक्षक अभियंता,बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ,परळी वैजनाथ
अधीक्षक अभियंता,उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ,उस्मानाबाद
अधीक्षक अभियंता,जायकवाडी प्रकल्प मंडळ,औरंगाबाद
अधीक्षक अभियंता,उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ,नांदेड
अधीक्षक अभियंता व प्रशासक,लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद
अधीक्षक अभियंता व प्रशासक,लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,बीड
अधीक्षक अभियंता व प्रशासक,लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,अहमदनगर

**